# उपसंहार

# उपसंहार

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. ६५% जनता शेतीवर अवलंबून आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि विशेषत: २१ व्या शतकात भारतातील शेती आणि शेतकरी नेहमीच परिघस्थानी राहिले असून त्यांचे सतत शोषण झाले. या विरोधी शेतकऱ्यांनी आवाज उठविण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला. तरी या कृषीप्रधान देशात कृषीकेंद्रीत धोरणाची निर्मिती व अंमलबजावणी न झाल्याने व शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे, आंदोलनाकडे लक्ष न दिल्याने शेतकऱ्यांस दारिद्र्य अवस्था प्राप्त झाली. तसेच या शतकात भारतीय शेतीसमोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य व किफायतशीर भाव मिळत नाही. परिणामत: शेती व्यवसाय हा धोक्यात आला आहे. अशा परिस्थितीत दक्षिण महाराष्ट्रात शेती मालाला विशेषत: ऊसास आणि दुधास योग्य भाव मिळविण्यासाठी शेतकऱ्यांचे आंदोलन झाले.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात महात्मा फुले व न्यायमूर्ती म. गो. रानडे यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडली. २० व्या शतकात महात्मा गांधींनी 'चंपारण्य' व सरदार वल्लभभाई पटेल यांनी 'बार्डोली' येथे शेतकऱ्यांची यशस्वी आंदोलने केली. महाराष्ट्रात केशवराव जेधे, शंकरराव मोरे व क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची सत्ता भांडवलदारांच्या हाती जावू नये ती कामगार जनतेच्या हाती यावी म्हणून १९ सप्टेंबर १९४६ मध्ये काँग्रेस अंतर्गत 'काँग्रेस शेतकरी संघ' स्थापन केला. तसेच प्रा. एन. डी. पाटील यांनी महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखानदारी विरोधात आवाज उठवला. साखर कारखान्यांवर मोर्चे, धरणे यासारखे विविध आंदोलनात्मक कार्यक्रम त्यांनी हाती घेतले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९७० च्या दशकात भारतीय राजकारणात विविध नवसामाजिक चळवळींनी आपला अवकाश तयार केला आहे. संसदबाह्य राजकारणाला सुरवात झाली आहे. १९८० चे दशक हे 'शेतकरी चळवळीचे दशक' म्हणून ओळखले जाते. कारण या दशकाने शरद जोशींसारखा

शेतकरी नेता निर्माण केला होता. त्यांनी महाराष्ट्रात शेतकरी आंदोलने केली. या पार्श्वभूमीवर दक्षिण महाराष्ट्रात आमदार राजू शेट्टी यांनी 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' २००४ मध्ये स्थापन केली. या शेतकरी संघटनेच्या माध्यमातून दक्षिण महाराष्ट्रात ऊस उत्पादक व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आंदोलने केली. दुध बंद आंदोलन काळात राजू शेट्टी म्हणतात की, 'दुध पिणाऱ्याला अमृत, दुध उत्पादकास विष' आहे. तसेच ते शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करतात. तसेच महाराष्ट्रात २००५-०६ या वर्षी अतिवृष्टी झाली त्यामुळे नद्यांना महापुर आले. त्यातूनच शेती व शेतीसंलग्न असणाऱ्या उद्योगांचे खूप नुकसान झाले.

दक्षिण महाराष्ट्रामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आंदोलने केली. त्याचे कारण की, शासनाने ९% ऊस उताऱ्यासाठी प्रतिटन रू. ८०२.५०/- व त्यापासून पूढील प्रत्येक टक्क्यासाठी प्रतिटन रू. ९०/- ही किमान वैधानिक किंमत ठरवून दिली. साखर कारखान्यांवर ही किमान वैधानिक किंमत देणे शासनाने बंधनकारक केले. तसेच कर्ज म्हणून अबकारी कराच्या रक्कमा, पॅकेजेस दिली. मात्र साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना ऊसदर दिला नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मागणी उत्पादन खर्चावर आधारित दर ही सुद्धा मान्य झाली नाही. यावेळी राजू शेट्टी म्हणतात की, शेजारी कर्नाटक, तामिळनाडू व आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये ऊसास प्रतिटन १४०० ते १५०० रूपये भाव मिळतो. हा भाव महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना का मिळत नाही? यासाठी दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलने केली. तसेच दक्षिण महाराष्ट्रातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नव्हता. दुध उत्पादक संघांचे चालक आर्थिकदृष्ट्या सक्षम होतात. मात्र दुध उत्पादन करणारा शेतकरी त्यात लुबाडला जातो. त्यामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला. त्यातून शेतकरी संघटनेच्या माध्यमातून दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी दुध बंद आंदोलने केली. या आंदोलनामुळे शासनाने बसाक समिती स्थापन केली व त्यानुसार दुध दरवाढ केली. मात्र दुध दरवाढ दुध उत्पादक

संघांकडून दुग्धोत्पादकांना दिली जात नाही. या सर्व परिस्थितीतून ऊस उत्पादक व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या मनात असंतोष निर्माण होवून त्यांनी आंदोलने केली.

महाराष्ट्रात साखर उद्योगाच्या बळावर सहकार व्यवस्था बळकट झाली. हळूहळू सरकाराचा स्वहाकार झाला. संस्थांना संस्थानांचे रूप आले. भ्रष्टाचार हाच शिष्ठाचार बनला. साखर उद्योग हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक करण्याचा मार्ग बनला. शासन संस्था याकडे दुर्लक्ष करताना दिसून येते. तसेच आजपर्यंत राबवलेली कृषी धोरणे व कृषी कार्यक्रमांची फेरतपासणी सुरू झाली आहे. हे सिंहावलोकन करताना कृषी धोरण व कृषी कार्यक्रमांत सुधारणा करणे गरजेचे वाटते व ती सुधारणा कशी करावी लागेल. याबद्दल विचारमंथन सुरू आहे. कारण शासनाने ठरवून दिलेले ऊसदर व दुध दर, साखर कारखाने व दुध उत्पादक संघ देत नाहीत. या प्रकारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा गांभीर्यपूर्ण दृष्टीकोन निर्माण झाला आहे.

**शोध प्रबंधाची प्रकरण योजना :**

प्रस्तूत संशोधनाची मांडणी पाच प्रकरणांत करण्यात आलेली आहे.

१) महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची पार्श्वभूमी.

२) दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे ऊस आंदोलन (२००७).

३) दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे दुध बंद आंदोलन (२००७).

४) दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनाचा महाराष्ट्र शासनावर आणि शेतकऱ्यांवर झालेला परिणाम.

५) शेतकरी आंदोलनाचा टीकात्मक अभ्यास.

**संशोधनातील प्रकरणांचा सारांश :**

प्रकरण योजनेचा सारांश रूपाने थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे-

**प्रकरण पहिले - महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची पार्श्वभूमी :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात झालेली आंदोलने : १८६७ मधील बंगाल व बिहार येथील नीळ उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन, १८७३-७४ चा

दख्खनचा उठाव, १८७७-७८ चा मुंबई प्रांतातील दुष्काळ, महात्मा फुलेंचे शेती व शेतकरी विषयक कार्य, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, १९०६ चा चंपारण्य सत्याग्रह, १९१७-१८ चा खेडा सत्याग्रह, १९२१ चे मोपल्यांचे बंड, १९२०-२१ चा मुळशी सत्याग्रह, १९२८ चा बार्डोली सत्याग्रह, पंजाब मधील शेतकरी आंदोलने, स्वातंत्र्यानंतरची शेतकरी आंदोलने, १९६० च्या दशकात झालेली हरीतक्रांती, स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाचे धोरण, महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनाचा उदय, प्रा. एन. डी. पाटील यांचे शेतकरी विषयक कार्य, शरद जोशी यांची शेतकरी आंदोलने : १९७८ ते ८० चे कांदा आंदोलन, १९८० चे ऊस आंदोलन, १९८१ चे तंबाखु आंदोलन, १९८२ चे दुध आंदोलन, १९८६ चे कापूस आंदोलन, १९८८-८९ ची कर्जमुक्ती शेतकऱ्यांच्यात झालेली राजकीय जागृती, दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनाची पार्श्वभूमी इत्यादी बाबींचा विस्तृत आढावा घेतला आहे.

**प्रकरण दुसरे - दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे ऊस आंदोलन ( २००७ ) :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये २००६-०७ आणि २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील शेतीविषयक तरतुदी, दक्षिण महाराष्ट्रातील ऊस क्षेत्राचा आढावा, साखर कारखाने व त्यांचे साखर उत्पादन, साखर उतारा, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांना संघटीत करण्यासाठी झालेले प्रयत्न, ऊस आंदोलनाची पार्श्वभूमी, ऊस आंदोलन, ऊस आंदोलनातील शेतकऱ्यांचा सहभाग व नेतृत्त्व, शेतकऱ्यांनी शासनासमोर मांडलेल्या मागण्या, महाराष्ट्रात ऊसाची किंमत ठरविणारे घटक, इत्यादी सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण तिसरे - दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे दुध बंद आंदोलन ( २००७ ) :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील दुग्धोत्पादन, दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादनाचा आढावा, दक्षिण महाराष्टातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना संघटीत करण्यासाठी झालेले प्रयत्न, दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे

दुध बंद आंदोलन, दुध बंद आंदोलनातील शेतकऱ्यांचा सहभाग व शासनाचे धोरण या बाबींचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण चौथे - दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनाचा महाराष्ट्र शासनावर आणि शेतकऱ्यांवर झालेला परिणाम :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये शेतकरी संघटनेने केलेल्या ऊस आंदोलनाचा शासनावर झालेला परिणाम, सहकारी साखर कारखान्यांवर झालेला परिणाम, दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर ऊस आंदोलनाचा झालेला परिणाम, शेतकरी संघटनेने केलेल्या दुध बंद आंदोलनाचा शासनावर झालेला परिणाम, अशोक बसाक समितीच्या दुध दरवाढीबाबतच्या शिफारशी, दुध बंद आंदोलनामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचा झालेला फायदा इत्यादी बाबींचा सविस्तर अभ्यास केला आहे.

**प्रकरण पाचवे - शेतकरी आंदोलनाचा टीकात्मक अभ्यास :**

प्रस्तूत प्रकरणामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोरील समस्या आणि .या समस्यांवर सुचविण्यात आलेले उपाय, सहकारी साखर कारखान्यांसमोरील समस्या व त्यावर सुचविलेले उपाय, दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावर सुचविण्यात आलेले उपाय, दुध उत्पादक संघासमोरील समस्या व त्यावर सुचविलेले उपाय, दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे यशापयश, निष्कर्ष, भविष्यकालीन आंदोलनाची दिशा इत्यादी बाबींचा सखोल अभ्यास केला आहे.